


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३५७, मंगळवार २९ ऑक्टोबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# निवडणूकांपुरते लोकांमध्ये येणारे निवडणूकीनंतर गायब होतात!

■ खा. नीलेश लंके यांचा विरोधकांना टोला
■ पिंपरी चिंचवड येथे पारनेर-नगरकरांचा स्नेह मेळावा

पिंपरी चिंचवड : प्रतिनिधी

**निवडणूका आल्या की लोकांमध्ये मिरवणारे निवडणूका झाल्या की गायब होतात. आम्ही २४ तास ३६५ दिवस जनतेमध्ये राहून प्रत्येकाच्या सुख, दुःखात सहभागी होऊन आधार देण्याचा प्रयत्न करतो असे सांगत खा. नीलेश लंके यांनी विरोधकांना टोला लगावला.**

पारनेर-नगर मतदार संघातील पुण्यात स्थायिक झालेल्या नागरिकांच्या स्नेह मेळाव्यात खा. लंके हे बोलत होते. विधानसभेच्या पारनेर-नगर मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार राणीताई लंके यावेळी उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, प्रतिकुल परिस्थितीशी सामाना कसा करावा हे पुणे, मुंबईत राहणाऱ्या पारनेर-नगरकरांकडून शिकले पाहिजे. वेगवेगळया क्षेत्रात चमकणारे आपले कोहिनूर हिरे आपल्या मतदार संघाच्या हितासाठी महत्वाचे आहेत. त्यांच्या कोणत्याही अडचणींमध्ये मदत करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर असल्याची ग्वाही लंके यांनी दिली. लंके पुढे म्हणाले, निवडणूका येतात, जातात परंतू आमच्या पुणे-मुंबई तसेच इतर शहरांतील आमच्या नागरीकांच्या सुख, दुःखात कोण असते हे सर्वांना माहीती आहे. कोरोना संकटात आपण सर्वजण गावाकडे आलो. माणूस कितीही मोठा झाला तरी त्याचा शेवट मायभुमीतच होत असतो. प्रत्यक माणूस इतर कोणत्याही राज्यात जाऊ द्या, परदेशात जाउ द्या, त्याला त्याची मायभुमीच श्रेष्ठ असते. कोरोना संकट असो अथवा इतर कोणतीही अडचण असो असो माझे कुटूंब कायम मदतीसाठी अग्रभागी राहिले आहे. तुम्ही सर्वांनी मला विधानसभेत पाठविल्यानंतर मतदार संघाची उंची राज्यात, देशात वाढविण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला. तुमचे सर्वांचे आशिर्वाद, सहकार्य यामुळेच आज मी भारताच्या आदर्श संसदेत पोहचलो. याचे सर्वस्वी श्रेय तुमचे आहे हे मी कधीही विसरू शकणार नाही असे खा. लंके यांनी यावेळी नम्रपणे सांगितले. यावेळी भगवान पठारे, नाना गाडगे, सुधाकर दळवी, हरिभाऊ तिकोणे, नानासाहेब खोडदे, बाळासाहेब सालके, भास्करराव खोसे, श्रीकांत मोरे, युवराज गुंजाळ, जालिंदर दिघे, संतोष मापारी, बाळासाहेब सालके सर, बंडू साबळे, राहुल खामकर, सुरेश फापाळे, सचिन उंडे, डॉ. विवेक चौधरी, अजय साठे, रणजित दळवी, बजरंग गागरे, अभय नांगरे, महेश गवळी, बंडू झावरे, जयवंत पानमंद, सुयोग सालके, गणेश दरेकर, प्रवीण येणारे, रावसाहेब ठाणगे, गणेश गाडीलकर, सचिन बर्वे, दत्ता येवले, अमित खिलारी, अप्पासाहेब तांबडे, बारकू रोहोकले, तुषार आंधळे, विकास शेटे आदी यावेळी उपस्थित होते.



■ पिंपरी चिंचवड येथे पारनेर-नगर मतदारसंघातील नागरीकांच्या स्नेहमेळाव्यात खा. नीलेश लंके यांनी मार्गदर्शन केले.

### आता प्रत्येक क्षेत्रात महिला दिसतील

या मेळाव्यास मोठया संख्येने भगिनी उपस्थित आहेत, याचा आनंद आहे. महिलांना ५० टक्के आरक्षण असतानाही आपण मागे राहतो. लोकशाही पध्दतीत एक चाक हे महिलांचे असते. त्याच पध्दतीने आपल्या मतदार संघातील महिलांना स्थान दिले जाईल. कोणत्याही गोष्टीत महिला मागे रहायला नको यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. भविष्यात प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग असलेला आपणास पहावयास मिळेल.

**राणी नीलेश लंके**
उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

### जिल्ह्यात मतदार संघाची उंची वाढविली

खा. नीलेश लंके यांच्या खांद्याला खांदा लाऊन मी राजकारणात आलेली आहे. पंचायत समितीमध्ये उत्कष्ट कामकाज केले. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्हयात मतदार संघाची उंची वाढविली. सर्वाधिक विकास निधी मंजुर करून आणला. कोरोना संकटात माझे पती खा. नीलेश लंके हे दररोज कोव्हीड सेंटरमध्ये रूग्णांची सेवा करत होते. एक पत्नी म्हणून माझ्या अंतकरणाला वेदना झाल्या तरी आपल्या जिवा भावाच्या लोकांची सेवा करण्यासाठी, त्यांना धीर देण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकार मला उभारी देत होता. अशा भावना राणी लंके यांनी यावेळी व्यक्त केल्या.

### विकासासाठी आमदारकी महत्वाची

महाविकास आघाडीच्या वतीने पत्नी राणी लंके यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची उमेदवारी जाहिर झालेली आहे.मतदारसंघाच्या विकासाठी, प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आमदारकी महत्वाची असून येणाऱ्या काळात राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार सत्तेवर येणार असल्याने सर्वांनी राणी लंके यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन लंके यांनी केले.

### त्यांच्यावर बोलून वेळ वाया घालणार नाही

मला विरोधकांवर बोलून वेळ वाया घालण्यात स्वारस्य नाही. निवडणूकांपुरते लोकांमध्ये येणारे निवडणूकानंतर मात्र गायब होतात. हे मतदार संघातील जनतेला चांगले माहिती आहे. मी त्यांच्यावर बोलायला लागल्यावर मैदानात कोणीही राहणार नाही. मैदानात कोणीतरी खेळाडू पाहिजे या भुमीकेतून आज कोणावरही न बोललेले बरे.

**खा. नीलेश लंके**

# काशिनाथ दाते यांना महायुतीची उमेदवारी

उमेदवारीचा घोळ अखेर संपुष्टात | दाते मंगळवारी अर्ज दाखल करणार



■ महायुतीची उमेदवारी जाहिर झाल्यानंतर काशिनाथ दाते यांनी राळेगणसिध्दीत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट घेऊन आशिर्वाद घेतले.

पारनेर : प्रतिनिधी

**अनेक नाटयमय घडामोडीनंतर अखेर पारनेर-नगर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे काशिनाथ दाते यांच्या महायुतीच्या उमेदवारी शिक्कामोर्तब करण्यात आले. दरम्यान, दाते हे मंगळवारी सकाळी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून त्यासाठी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.**

महायुतीकडून काशिनाथ दाते यांच्यासह सुजित झावरे, माधवराव लामखडे, विजय सदाशिव औटी हे इच्छुक होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यास प्रारंभ झाल्यानंतर दररोज महायुतीच्या उमेदवारीसंदर्भात वेगवेगळया वावडया उठत होत्या. विजय औटी यांची उमेदवारी निश्‍चित झाल्याचे दररोज सांगण्यात येत होते.अगदी औटी समर्थकांनी फटाक्यांची आताषबाजी करीत औटी यांच्या उमेदवारीचे स्वागत करण्यात आले होते. समर्थकांनी सोशल मीडियावर औटी यांना अजित पवार, डॉ. सुजय विखे यांच्या अभिनंदनाचे बॅनरही व्हायरल केले होते.

अखेर रविवारी अजित पवार यांनी मुंबईत काशिनाथ दाते यांच्या उमेदवारीची घोषणा करून महायुतीच्या उमेदवारीची प्रतिक्षा संपविली. पवार यांनी घोषणा केली त्यावेळी महायुतीचे पदाधिकारी व इच्छुक उमेदवारही मुंबईत उपस्थित होते. पवार यांनी दाते यांना पुष्पगुच्छ देत त्यांना निवडणूकीसाठी शुभेच्छा दिल्या.

उमेदवारी जाहिर झाल्यानंतर पारनेकडे परतल्यानंतर दाते व त्यांच्या समर्थकांनी राळेगणसिध्दीत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट घेउन आशिर्वाद घेतले. हजारे यांनी दाते यांना निवडणूकीसाठी शुभेच्छा दिल्या.

सोमवारी दाते यांनी नगरमध्ये मा. आ. शिवाजी कडले, अरूणकाका जगताप, भानुदास बेरड, बाबूशेठ टायरवाले यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन चर्चा केली.

### पानोलीकर भरणार अनामत रक्कम

काशिनाथ दाते हे मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार असून उमेदवारी अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम पानोलीचे ग्रामस्थ भरणार आहेत. सुशिक्षित व सोज्वळ व्यक्तीमत्वाला महायुतीने उमेदवारी दिली असून त्यामुळेच आम्ही त्यांची अनामत रक्कम भरण्याचा निर्णय घेतला.

**अरूण खामकर**
ग्रामस्थ पानोली

# मा. आ. विजय औटी यांचा अपक्ष अर्ज दाखल

■ सोमवारी चार अर्ज दाखल ■ एकूण सहा व्यक्तींनी नऊ अर्ज खरेदी केले

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर-नगर मतदारसंघात सोमवारी विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजय औटी यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान, सोमवारी एकूण चार उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले असून एकूण सहा व्यक्तींनी नऊ अर्ज खरेदी केले.**

सोमवारी सकाळी मा.आ. विजय औटी यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्यासह प्रविण सुभाष दळवी, ज्ञानदेव कोंडीबा जगताप, किसन मारूती पठारे यांनीही आपले अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले. दरम्यान, यापूर्वी महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्यासह डॉ.श्रीकांत तानाजी पठारे, भाऊसाहेब माधव खेडेकर यांनी यापूर्वी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले असून उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांची संख्या आता ७ इतकी झाली आहे. मंगळवारी अर्ज दाखल करण्याची अखेरची मुदत असून अखेरच्या दिवशी किती उमेदवारी अर्ज दाखल होतात याची उत्सुकता आहे.

सोमवारी सतिश भाउसाहेब म्हस्के पारनेर यांनी अविनाश मुरलीधर पवार सुपा यांच्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना व अपक्ष म्हणून प्रत्येकी एक अर्ज, अॅड. सचिन एकनाथ कोकाटे वारणवाडी यांनी स्वतःसाठी अपक्ष म्हणून एक अर्ज, दिलीप सोपान दिवटे वाघुंडे बुद्रुक यांनी स्वतःसाठी अपक्ष म्हणून एक अर्ज, नवनाथ धोंडीभाऊ लंके वडगांव गुंड

उर्वरीत पान ३ वर



■ विधानसभेचे मा. उपाध्यक्ष विजय औटी यांनी सोमवारी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर केला.

### सुजित पाटलांचा प्रहारसाठी अर्ज

जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे यांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी सोमवारी त्यांच्यासाठी प्रहार पक्षासाठी अर्ज खरेदी केला आहे. पाटील मंगळवारी आपला अर्ज दाखल करणार असून ते अपक्ष लढणार की प्रहार संघटनेकडून लढणार याची उत्सुकता आहे.

# सारसनगरची आदर्शनगरच्या दिशेने वाटचाल

■ आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन ■ प्रचार फेरीस सारसनगरकरांचा मोठा प्रतिसाद



नगर : प्रतिनिधी

**एकेकाळी सुविधांचा वानवा असलेल्या सारसनगरचा आज सर्वांगीण विकास झाला असून त्यामुळेच चांगल्या सुविधा मिळतात म्हणून या भागात लोकांना राहण्यास आवडते. विविध विकास कामांमुळे सारसनगरची आदर्शनगरकडे वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.**

यावेळी बोलताना आ. जगताप म्हणाले, चांगल्या सोई सुविधा मिळत असल्याने सारसनगर भागात लोकवस्ती झपाटयाने वाढत आहे. सारसनगर मधील रस्ते, पाणी, पथदिवे, आरोग्य या मुलभूत गरजा पुर्ण करण्याबरोबरच या भागात आता नगरमधील पहिले सर्व सोई सुविधांयुक्त स्पोर्टस कॉम्लेक्स उभारण्यात येत आहे. उद्यान, सर्व सामाजासाठी सभामंडप, अंतर्गत रस्त्यांचे ९० टक्के कॉंक्रीटीकरण, सुशोभिकरण आदी विकास कामांमुळे सारसनगरची वाटचाल आता आदर्श नगरकडे सुरू झाली आहे. या भागात मिळत असलेल्या सर्वोत्तम सुविधांमुळे नागरीक समाधान व्यक्त करत असल्याचे जगताप म्हणाले.

विधानसभा निवडणूकीचा अर्ज दाखल केल्यानंतर आ. संग्राम जगताप यांनी प्रचारात आघाडी घेतली असून शहरातील विविध प्रभागांमध्ये त्यांनी प्रचारास सुरूवात केली आहे. सर्वच प्रभागांमध्ये त्यांना उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. सारसनगर भागातही नागरीकांचा त्यांना मोठा प्रतिसाद लाभला. त्यांचे आगमन झाल्यानंतर जेसीबीच्या मदतीने पुष्पवष्टी करण्यात आले. क्रेनच्या सहाययाने मोठा पुष्पहार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. युवा प्रतिष्ठान, स्वराज्य युवा प्रतिष्ठानच्या वतीने जगताप यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी उपमहापौर गणेश भोसले, मा. नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, डॉ.विजय भंडारी, ज्ञानदेव पांडूळे, दत्ता खैरे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा. माणिकराव विधाते, छबूराव कांडेकर,बापूसाहेब ओव्हळ,विष्णू कलागते, लकी खुबचंदानी, महादेव कराळे, दादा दरेकर, धर्मा कारंडे, बाबासाहेब भगत, राजू ससाणे, देशमुख सर, समीर खडके, अशोक म्हस्के, शरद भांबरे, दिपक गांधी, कांतीलाल गांधी, पंकज मेहेर, प्रकाश ईवळे, अरूण गाडळकर, झुंबरराव आव्हाड, बबन घुले, अनिल पालवे, अलिशा गर्जे, किरण कटारिया यांच्यासह नागरीक महिला यावेळी उपस्थित होत्या.

### उस्फुर्त स्वागत

महात्मा फुले चौकापासून सुरू झालेली प्रचार फेरी त्रिमुत चौक, सारस कॉलनी, सचिननगर, राधाकृष्ण मंदिर, शिवगंगा टॉवर, कपिलेश्वर कॉलनी, राजश्री कॉलनी, भगवानबाबा चौक, मधुबन कॉलनी, राजमाता कॉलनी, चिपाडे मळा, नानाजीनगर आदी भागांमध्ये झाली. यावेळी ठिकठिकाणी आ. जगताप यांचे नागरीकांनी उस्फुर्त स्वागत करीत महिलांनी त्यांचे औक्षणही केले.

### सारसनगरचा कायापालट

आ. जगताप यांनी काही वर्षात सारसनगरचा कायापालट केला आहे. परिसरातील जवळपास सर्व प्रश्न, समस्या माग लागल्या आहेत. ११ कोटी रूपये खर्चाचे अरूणोदय स्पोर्टस कॉम्प्लेक्स हे अधुनिक क्रीडा संकुल पुर्णत्वास येत आहे. स्वामी समर्थ केंद्र व जैन समाजाच्या सभामंडपासाठी प्रत्येकी २५ लाख रूपयांचा निधी देण्यात आला आहे. सारसनगरमध्ये प्रवेश करताना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले नगर नामकरण करण्यात येऊन स्वागत कमान उभारण्यात आली आहे. सर्व जातीधर्मासाठी योगदान देताना ख्रिश्चन समाजासाठी चर्च व सभामंडप, भगवानबाबा मंदिर सभामंडप, गाडगेबाबा मंदिर सभामंडप, सिदाजी अप्पा मंदिरासाठी जागा व सभामंडप, नाभिक समाजासाठी जागा व सभामंडप, तुकाराम महाराज मंदिरासाठी जागा व वॉलकंपाउंड, मुबलक पाणी पुरवठयासाठी सात लाख लिटरची पाण्याची टाकी, महात्मा फुले चौकाजवळ सारसनगर रस्त्यावर व नानाजीनगरला नवीन पुलाचे बांधकाम करण्यात आले असून प्रभागातील ९० टक्के रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण झाले आहे. मधुबन कॉलनीत वाचनालय, राजमाता कॉलनी येथे आरोग्य केंद्र, त्रिमुत चौक येथे आरोग्य उपकेंद्र, ओपन स्पेसला वॉल कंपाउंड तसेच पेव्हींग ब्लॉक बसवून सुशोभीकरण करण्यात आले आहे.

**प्रकाश भागानगरे**



# चंदेरी

## ...म्हणून रविना टंडनने केले घटस्फोटिताशी लग्न!



बॉलीवूड अभिनेत्री रविना टंडन तिच्या काळातील एक आघाडीची अभिनेत्री होती. अभिनयाच्या बळावर तिने अनेक चित्रपट यशस्वी करून दाखवले. आजही ती बॉलिवूडमध्ये सक्रिय आहे. करिअरच्या शिखरावर असताना तिच्याकडे अनेक जाहिराती होत्या. जाहिरातींमधून सुद्धा तिने कोट्यवधी रुपयांची कमाई केली. अभिनेत्यांपासून तर चित्रपटसृष्टीची निगडित असलेल्या अनेकांचा रविनावर जीव जडला होता. मात्र असे असताना रविनाने एका घटस्फोटित उद्योगपतीशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. रविनाच्या या निर्णयाचे त्यावेळी अनेकांना आश्चर्य वाटले. मात्र गेल्या २२ वर्षांपासून दोघांचा सुखाचा संसार सुरू आहे. घटस्फोट, ब्रेकअप या गोष्टी बॉलिवूडला नवीन नाहीत. बॉलिवूडमध्ये कुणाचे नाते फार काळ टिकत नाही. मात्र असे असताना रविनाचा तिच्या पतीसोबतचा संसार अतिशय आनंदात सुरू आहे.

उद्योगपती आणि चित्रपट वितरक अनिल थडाणी आणि रविना पहिल्याच भेटीत एकमेकांच्या प्रेमात पडले होते. पहिल्या भेटीच्या दोन महिन्यांनंतर दोघांनी एकमेकांच्या प्रेमाची कबुली दिली. योग्य जीवनसाथी मिळाल्याची खात्री झाल्याने दोघांनी लग्नाला उशीर केला नाही. विशेष म्हणजे रविनाने लग्नाआधीच दोन मुलींना दत्तक घेऊन आई होण्याचा निर्णय घेतलेला होता. जो व्यक्ती आपल्या मुलींनासुद्धा प्रेम देईल त्याच्याशीच लग्न करेल, असा निर्णय रविनाने घेतलेला होता आणि उद्योगपती अनिल यांनी रविनाच्या निर्णयाचा स्वीकार केला. त्याचबरोबर दोघांच्या लग्नाचा मार्ग मोकळा झाला. लग्नानंतरसुद्धा अनिल रविनाला दिलेले वचन पाळताना दिसत आहे. पतीच्या वाढदिवशी रविनाने केलेल्या एका पोस्टमध्ये पतीचे खूप कौतुक केले. जो तुम्हाला जसेच्या तसे स्वीकारतो असा जोडीदार कुणाला नको असेल. सर्वोत्तम पती, वडील, जावई असे रविनाने पतीचे कौतुक केले आहे. दोघांच्या प्रेमामुळे त्यांचे नाते आजपर्यंत मजबुतीने टिकून आहे.

## मानधनातील तफावतीवरून हुमा कुरेशीचा संताप!

बॉलिवूड अभिनेत्री हुमा कुरेशी नेहमीच चर्चेत असते. सोशल मीडियावरसुद्धा तिचे लाखो चाहते आहेत. सध्या ती तिच्या एका विधानामुळे चर्चेत आली आहे. बॉलिवूडमध्ये अभिनेते आणि अभिनेत्रींना मिळणाऱ्या मानधनात प्रचंड तफावत असते. नायकांइतके मानधन मिळविण्याचा आमचाही अधिकार आहे, आमचीही योग्यता आहे, असे विधान तिने केले आहे.

ज्या चित्रपट आणि वेब सीरिजमध्ये मला सशक्त महिला पात्र साकारायला मिळतात, त्या चित्रपटांचा आणि वेब सीरिजचा एक भाग म्हणून मी स्वतःला भाग्यवान समजते. एक समाज म्हणून आपल्याला सशक्त महिला आवडत नाहीत. आम्हाला अशा स्त्रिया आवडतात ज्या त्यांच्या विचार आणि भावनांबद्दल बोलू शकत नाहीत. हे आपल्या चित्रपटांमध्येही दिसून येते, असे हुमा म्हणाली. मात्र आता काळ बदलत आहे आणि महिला केंद्रित भूमिकांना सुद्धा अधिक मागणी आहे. बॉलीवूडमधील अभिनेत्रींच्या पगारातील तफावतीवर भाष्य करताना हुमा म्हणाली, की पुरुष नायकांना पुरुषकेंद्रित चित्रपट करून स्वतःला सिद्ध करण्याची गरज नाही. मात्र महिलांना स्त्री केंद्रीत चित्रपट करून स्वतःला सिद्ध करावे लागते. बॉलिवूडमध्ये अभिनेत्यांना जेवढे मानधन मिळते तेवढे मानधन मिळविण्याचा आमचाही अधिकार आहे. बॉलिवूडमध्ये अनेक अभिनेत्री स्वतःच्या हिमतीवर चित्रपटाला हिट करत आहेत. त्यामुळे अधिक मानधन मागण्याची आमची योग्यता आहेच, असे हुमा कुरेशी म्हणाली.



**अजय देवगण आणि काजोलच्या लग्नाचा २५ वा वाढदिवस गेल्या आठवड्यात साजरा झाला. पडद्यावर त्यांची जोडी सुपरहिट ठरलीच; मात्र त्याहीपेक्षा पती- पत्नी म्हणून दोघांचे नाते सुपरहिट ठरले, असे म्हणावे लागेल. बॉलिवूडमध्ये एवढे दीर्घकाळ नाते टिकल्याची खूप कमी उदाहरणे आहेत. काजोलने घरच्यांचा विरोध असताना अजयशी लग्न करण्याचा निर्णय घेतला असला तरी आज मात्र तिच्या घरच्यांना देखील तिने घेतलेल्या निर्णयाचा अभिमान वाटतो...**

## प्रेम अन् विश्वासामुळे टिकले अजय-काजोलचे नाते!



काजोल आणि अजयची पहिली भेट झाली ती १९९५ मध्ये हलचल चित्रपटाच्या सेटवर. चित्रपटाच्या शूटिंगसाठी जेव्हा ती तयार झाली तेव्हा चित्रपटात हिरो कोण, असे सर्व जण विचारत होते. तेव्हा कुणीतरी सेटवर कोपऱ्यात बसलेल्या अजयकडे बोट दाखवले. त्यानंतर चित्रपटाच्या सेटवर आमच्यात मैत्री झाली, असे काजोलने सांगितले होते. जेव्हा त्यांची ओळख झाली तेव्हा अजय देवगण दुसऱ्या एका मुलीला डेट करीत होता आणि काजोलसुद्धा तिच्या बॉयफ्रेंडची तक्रार अजयकडे करीत होती. त्यानंतर काजोलचा ब्रेकअप झाला. आम्ही दोघांनी कधीच एकमेकांना प्रपोज केले नाही. मात्र तरीही आम्ही एकत्र असल्याचे आम्हाला वाटायचे, असे काजोलने तिच्या लव्ह स्टोरीबद्दल सांगितले होते. अजयने देखील त्यांच्या पहिल्या भेटीविषयी एका मुलाखतीत सांगितले होते. काजोल सेटवर खूप जोरजोरात बोलायची. त्यामुळे तिला पुन्हा भेटायची इच्छा होत नव्हती. तसे वागणे मला आवडत नव्हते, असे अजय म्हणाला होता. मात्र त्यानंतर सर्वच बदलले, असे तो म्हणाला. अजय आणि काजोल ४ वर्षे एकमेकांना डेट करत होते. त्यानंतर त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. अजयच्या कुटुंबियांनी लग्नाला परवानगी दिली तरी काजोलच्या वडिलांनी मात्र तिच्यासोबत चार दिवस बोलणे बंद केले होते. काजोलने करिअरकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे तिच्या वडिलांना वाटत होते. मात्र काही दिवसांनी काजोलच्या घरचे कसेबसे तयार झाले आणि २३ फेब्रुवारी १९९९ ला अतिशय साध्या पद्धतीने दोघांचे लग्न पार पडले. त्यानंतर गेली २३ वर्षे त्यांचा सुखाचा संसार सुरू आहे. दोघेही बॉलिवूडमध्ये असताना एवढे दीर्घकाळ नाते टिकणे ही सामान्य गोष्ट नक्कीच नाही. मात्र एकमेकांवरील प्रेम आणि विश्वास यामुळे दोघांचे नाते घट्ट झाल्याचे बॉलिवूडमध्ये बोलले जाते.

### एरिकाला जाड दिसण्यासाठी करावे लागत होते हे काम

एरिका फर्नांडिस सध्या टीव्ही मालिकांमध्ये काम करत आहे. असे असले तरी तिच्या करिअरची सुरुवात तिने मॉडेलिंग आणि दाक्षिणात्य चित्रपटाच्या माध्यमातून केली होती. आतापर्यंत तिने ७-८ चित्रपटांमध्ये काम केले आहे. मात्र साऊथ इंडस्ट्रीत काम करण्याचा अनुभव अतिशय खराब राहिल्याचे एरिका फर्नांडिसने नुकत्याच एका मुलाखतीत सांगितले. माझ्या शरीरामुळे मला अनेकदा अपमानित केले जात होते, असे तिने मुलाखतीत सांगितले. एरिकाचा शेवटचा दाक्षिणात्य चित्रपट २०१७ मध्ये रिलीज झाला होता. मुलाखतीत तिने सांगितले, की मी तेव्हा खूप बारीक होते. साऊथ चित्रपटाला जशी आवश्यकता होती तशी मी नव्हते, असे चित्रपटाच्या दिग्दर्शकांना वाटत नव्हते. त्यांना चित्रपटात कामुक आणि मादक दिसणे अपेक्षित होते. त्यामुळे जाड दिसण्यासाठी कपड्यांच्या आत मला पॅड घालावे लागत होते. मांड्यावर थाय पॅडपासून तर शरीरावर खुप सारे पॅड बांधावे लागत होते. मी जशी आहे तशी स्वीकारली गेली नाही. शरीराच्या प्रत्येक जागेवर पॅड बांधावे लागले, असे ती म्हणाली.

## ४७ वर्षांची उर्मिला अद्याप का नाही झाली आई?

बॉलीवूड आणि मराठी चित्रपटसृष्टीत अभिनेत्री ऊर्मिला मातोडकर यांनी अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केले. आजही त्यांना रंगीला गर्ल म्हणून ओळखलं जातं. कारण हा चित्रपट त्यांच्या करिअरमधील सर्वात मोठा चित्रपट होता. २०१६ मध्ये मोसिन अख्तर यांच्यासोबत लग्न केल्यानंतर उर्मिला यांनी करिअरमधून ब्रेक घेतला. त्यानंतर त्या कोणत्याही चित्रपटात दिसल्या नाहीत. नुकत्याच एका मुलाखतीत त्यांनी फिल्मी करिअरपासून तर व्यक्तिगत आयुष्यापर्यंत अनेक गोष्टींवर खुलासा केला आहे. मातृत्वाबद्दल तुमचे काय मत आहे? आई होण्याचा तुम्ही विचार करत आहात का? किंवा मूल दत्तक घेण्याचा विचार आहे का? असा प्रश्न उर्मिला यांना विचारण्यात आला तेव्हा त्या म्हणाल्या, याचा मी फारसा विचार करीत नाही. जेव्हा जे व्हायचे ते होईल, असे उर्मिला मातोंडकर म्हणाल्या. प्रत्येक स्त्रीने आई असणे आवश्यकच आहे असे नाही. योग्य कारणांसाठी मातृत्व हवे. मला मुलं आवडतात पण जगात अशी अनेक मुलं आहेत, ज्यांना प्रेमाची गरज आहे, असे उर्मिला म्हणाल्या. सिनेसृष्टीला अलविदा करण्याबद्दल उर्मिला यांना विचारण्यात आले तेव्हा त्या म्हणाल्या की, मी अभिनय कारकिर्दीचा त्याग केला नाही. आयुष्यात अनेक टप्पे येतात आणि जातात आणि या सर्व टप्प्यांवर माझा विश्वास आहे. लग्न झाल्यावर मला लग्नाचा आनंद घ्यायचा होता. आयुष्य एका ट्रॅकवर चालवणे मला आवडत नाही. आयुष्याची अनेक रूपे असायला हवीत. मला सर्व काही मोकळेपणाने जगायचे आहे.

## लक्ष्मीकांत बेर्डेंची धाकटी लेकही पडद्यावर



दिवंगत लक्ष्मीकांत बेर्डे मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते होते. आपल्या अभिनयाने त्यांनी मनोरंजन क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली होती. मराठीबरोबरच बॉलीवूड चित्रपटातही त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला होता. आजही त्यांचे चित्रपट प्रेक्षकांना खळखळवून हसवतात. लक्ष्मीकांत बेर्डे यांची पत्नी प्रिया बेर्डे यासुद्धा लोकप्रिय अभिनेत्री आहेत. लक्ष्मीकांत व प्रिया यांना दोन मुलं आहेत. मुलगा अभिनय मनोरंजन विश्वात कार्यरत आहे. आता त्यांची धाकटी मुलगी स्वानंदीही लवकरच अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार आहे.

या अगोदर स्वानंदीने नाटक व एकांकिकेतून आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली आहे. आता लवकरच तिचा पहिला चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'मन येड्यागत झालं' असे या चित्रपटाचे नाव आहे. या चित्रपटात स्वानंदीबरोबर अभिनेता सुमेद मुगदलकरची प्रमुख भूमिका आहे, तर अभिनेत्री श्वेता परदेशी सहकलाकाराच्या भूमिकेत झळकणार आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. या ट्रेलरला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळताना दिसत आहे. योगेश जाधव यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून, संदीप पांडुरंग जोशी, कुणाल दिलीप कंदकुर्ते व 'श्री वेद चिंतामणी प्रॉडक्शन' अंतर्गत या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. या चित्रपटातील गाण्यांनाही प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. निलेश पतंगे यांनी या गाण्यांना संगीत दिले असून या गाण्यांना जावेद अली, आदर्श शिंदे, हर्षवर्धन वावरे, आनंदी जोशी, निलेश पतंगे यांचा आवाज लाभला आहे. येत्या १ मार्चला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## भुताटकीच्या अनुभवांबद्दल अजय देवगण म्हणाला...



बॉलिवूडचा खरा ॲक्शन स्टार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजय देवगणने आतापर्यंत अनेक सुरपहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. गेल्यावर्षी त्याचे भोला, चाणक्यसारखे चित्रपट प्रदर्शित झाले. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटांनी चांगली कमाई केली होती. आता लवकरच त्याचा 'शैतान' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मध्यंतरी याचा एक छोटासा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. आता नुकताच या चित्रपटाचा थरकाप उडवणारा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. काळी जादू, वशीकरण अशा भयानक गोष्टींवर या चित्रपटाचं कथानक बेतलेलं आहे. याच चित्रपटाच्या ट्रेलर लाँच दरम्यान अजय देवगणने त्याला आलेल्या अशाच काही भयानक अनुभवांबद्दल शेअर केलं आहे. अजय म्हणाला, की गेल्या बऱ्याच महिन्यांपासून मला एक हॉरर चित्रपट करायचा होता. याआधी मी 'भूत'सारखा चित्रपट केला आहे. मला हा प्रकार खूप आवडतो. कारण आजही बऱ्याच ठिकाणी काळी जादूसारखी गोष्ट अस्तित्त्वात आहे. अशा अनैसर्गिक घटनांबद्दल बोलताना अजय म्हणाला, की मला असे भुताटकीचे बरेच अनुभव आले आहेत. आम्ही जेव्हा आऊटडोर शुटींगसाठी जायचो तेव्हा हे असे अनुभव आम्हाला बऱ्याचदा आले आहेत. त्यापैकी नेमकं किती खरं किती खोटं हे मला ठाऊक नाही. त्यापैकी काही घटना माझ्या लक्षातही आहेत. पण मी ज्यांना भेटलो आहे त्यांच्यापैकी अशी फार कमी लोक आहेत ज्यांचा या गोष्टीवर अजिबात विश्वास नाही. 'शैतान'मध्ये बॉलिवूडचे दोन दिग्गज अभिनेते अजय देवगण आणि आर. माधवन हे दोघे या प्रथमच एकत्र काम करत आहेत. ट्रेलरमध्ये आर. माधवनचं पात्र हे अजय देवगणवर चांगलंच भारी पडताना दिसत आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन विकास बेहल यांनी केलं आहे. 'शैतान' हा २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या गुजराती चित्रपट 'वश' चित्रपटाचा रिमेक असल्याचे सांगण्यात येत आहे. हा चित्रपट ८ मार्च २०२४ रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अजय देवगणबरोबर आर. माधवन, साऊथची सुपरस्टार ज्योतिका यांच्याही प्रमुख भूमिका आहे.

## चिमुकल्या मुलीसाठी शाहिदने सोडलं धूम्रपान!



अभिनेता शाहिद कपूर बॉलीवूड इंडस्ट्रीमधील लोकप्रिय अभिनेता आहे. आपल्या करिअरची सुरुवात नृत्यापासून करणाऱ्या या अभिनेत्याने प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवलं. करिअरच्या या खडतर प्रवासात शाहिदला धूम्रपान करण्याची सवय लागली होती. परंतु, नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत त्याने सांगितलं की, धूम्रपान करणे त्याने कायमचे सोडले आहे आणि त्याचं कारणही तितकंच खास आहे.

अभिनेत्री नेहा धुपियाच्या 'नो फिल्टर नेहा' या चॅट शोमध्ये शाहिदने हजेरी लावली होती. या मुलाखतीत शाहिदने सिगारेट सोडण्यामागचं कारण सांगितलं. तो म्हणाला, की माझ्या मुलीपासून लपून मी धूम्रपान करायचो आणि याच कारणामुळे धूम्रपान सोडण्याचा मी निर्णय घेतला. एके दिवशी जेव्हा मी माझ्या मुलीपासून लपून धूम्रपान करत होतो तेव्हा मी स्वतःला सांगितलं की, हे असं लपून मी कायमच धूम्रपान करू शकणार नाही आणि त्याच दिवशी मी धूम्रपान सोडण्याचा निर्णय घेतला. शाहिद आणि त्याच्या मुलीचं बाँडिंग खूप चांगलं आहे. अनेकदा तो त्याच्या कुटुंबासह माध्यमांसमोर आला आहे. शाहिद कपूर आणि मीरा राजपूत जुलै २०१५ मध्ये विवाहबंधनात अडकले. शाहिद आणि मीराला दोन मुले आहेत, मिशा आणि जैन. मीशा कपूर ही सात वर्षांची आहे, तर जैन हा चार वर्षांचा आहे. दरम्यान, शाहिदच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' हा चित्रपट ९ फेब्रुवारी २०२४ ला प्रदर्शित झाला. या चित्रपटात शाहिद कपूर आणि क्रिती सॅनोनची मुख्य भूमिका आहे. बॉक्स ऑफिसवर चांगली सुरुवात केल्यानंतर, 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया'ने ५० कोटींचा आकडा पार केला आहे. 'देवा' या अगामी चित्रपटात शाहिद कपूर पूजा हेगडेसह झळकणार आहे. हा चित्रपट ऑक्टोबर २०२४ रोजी प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

## शॉर्ट न्यूज

### विद्यापीठातील तक्रारींबाबत चौकशी समिती नेमणार

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाबाबत तक्रारींची वाढती संख्या तसेच अनेक प्रकरणांमध्ये अफरातफरीच्या तक्रारी, तसेच पुराव्यांबाबत गंभीर दखल घेतली असल्याचे महाराष्ट्र कृषी, शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार यांनी सांगितले. त्याबाबत लवकरच चौकशी समिती नेमून फास्ट ट्रॅक अहवाल सादर करीत दोषी असल्यास कठोर कारवाई केली जाणार असल्याची माहिती दिली. महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये अनागोंदी कारभार सुरू असल्याच्या अनेक तक्रारी प्रशासनाकडे देण्यात आल्या आहेत.

### विखेंना पारनेरमध्ये फिरू देणार नाही

**पारनेर :** एक आदर्श राजकारणी म्हणून माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात व त्यांच्या कुटुंबाकडे पाहिले जाते. भाजप पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी रात्री जयश्री थोरात यांच्याविरुद्ध खालच्या पातळीवर जाऊन गरळ ओकली आहे. या वक्तव्याचा पारनेर तालुका काँग्रेसच्या वतीने निषेध करण्यात आला. माफी न मागितल्यास माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना पारनेर तालुक्यात फिरू न देण्याचा इशारा विनायक दातीर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

### सराईत गुन्हेगार २ वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार

**नेवासा :** पोलीस ठाणे येथील सराईत गुन्हेगार आकाश उर्फ देवा जालिंदर लष्करे रा. नेवासा यास पोलिसांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५६ अन्वये २ वर्षासाठी हद्दपार केले आहे. नेवासा पोलीस ठाणे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार देवा लष्करे याच्यावर पोलीस ठाणे नेवासा व शनिशिंगणापूर येथे खुनाचा प्रयत्न, गंभीर जखमी करणे, जवळ बेकायदेशीर धारदार शस्त्र बाळगणे या सारखे अनेक गुन्हे दाखल आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातून २ वर्षासाठी हद्दपार करण्याचा आदेश दिला आहे. त्याप्रमाणे लष्करे यास ताब्यात घेऊन संभाजीनगर जिल्ह्यात दाखल केले.

### कोपरगाव विधानसभा मतदार संघात सोळाशे अधिकारी

**कोपरगाव :** निवडणूक हा लोकशाहीचा सोहळा आहे. या कामामध्ये न्यूनगंड न बाळगता प्रत्येकाने मनापासून सहभागी व्हावे. निवडणूक कर्तव्य बिनचूक पार पाडण्यासाठी सर्वांनी मतदान प्रक्रिया समजावून घ्यावी, असे प्रतिपादन शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी केले. कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्यावतीने आत्मा मालिक सभागृहात आयोजित निवडणूक कर्मचाऱ्यांच्या पहिल्या प्रशिक्षणाच्या दुसऱ्या सत्राला मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

### अत्याचाराबाबत जामखेड पोलीस स्टेशनला दिले निवेदन

**जामखेड :** दि.रोजी जामखेड येथील सर्व अंगणवाडी सेविका यांनी दिले तहसील कार्यालय व जामखेड पोलीस स्टेशनला निवेदन यावेळी सुरेखा सदाफुले यांनी बोलताना सांगितले आहे की, आमची सहकारी अंगणवाडीचे सेविका वर एका नराधमाने अमानुषपणे बलात्कार करून तिच्या हत्या केलेले आहे. तरीपण आमच्या सर्व अंगणवाडी सेविकेच्या मतीने त्या नराधमाला लवकरात लवकर फाशीची शिक्षा व्हावी अशी आमच्या सर्व अंगणवाडी सेविका तर्फे विनंती आहे. कारण आता आमच्या अंगणवाडी सेवकांना आधार नाही.

# शिरुरमधून प्रदिप कंद यांची अपक्ष उमेदवारी!

## लोणीकंद येथे निर्धार मेळाव्यातून घोषणा | निर्धार मेळाव्याला जनतेचा प्रचंड प्रतिसाद



**शिरुर : प्रतिनिधी**

**शिरूर- हवेलीतून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्धार आज जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष भाजपा नेते प्रदिप कंद यांनी निर्धार मेळाव्यात जाहीर केला. त्यांच्या या निर्णयाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.**

रविवारी पेरणे फाटा येथील गोल्डन पॅलेसमध्ये शिरूर व हवेली भारतीय जनता पार्टी तसेच सहकाऱ्यांच्या वतीने विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते आणि महिला भगिनी श्री. कंद यांचे सहकारी, मित्र परिवार यांच्या प्रचंड प्रतिसादातून संपन्न झालेल्या या मेळाव्याच्या माध्यमातून प्रदिप कंद यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

महाविद्यालयात असल्या पासून समाजकार्य करण्याची ओढ राजकारणात घेऊन आली तेव्हापासून आजपर्यंतचा राजकीय प्रवास हा प्रामाणिकपणे केवळ माझ्या जनतेच्या सेवेसाठी केला असल्याचे सांगून श्री. कंद म्हणाले, राजकारणात अनेक वेळा संधीने हुलकावणी दिली पण ज्या संधी मिळाल्या त्याचे सोने करत जनतेची कामे आजवर केली आहेत. लोणीकंद गावाचा सरपंच म्हणून सुरुवात केली तेव्हापासून, अगदी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे काम करताना माझ्या सहकाऱ्यांनी खंबीर साथ दिली आहे.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पुणे जिल्हा परिषद उपाध्यक्ष, अध्यक्षपदी काम करण्याची संधी दिली, या पदावर काम करताना जनतेच्या हितासाठी कार्यरत राहिलो. माझ्या संपूर्ण कारकिर्दीत कधीच भ्रष्टाचाराचे आरोप कुणी करू शकणार नाही एवढं प्रामाणिक काम आजवर केलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये असताना, त्यानंतर भाजपा मध्ये काम करताना निष्ठा ठेऊन वरिष्ठांनी दिलेला आदेश प्रत्येक वेळी पळाला. २०१४ साली तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराचे काम असेल, २०१९ च्या विधानसभेत बाबुराव पाचर्णे साहेबांचे काम असेल प्रत्येक वेळी संधीने हुलकावणी देऊन सुद्धा निष्ठेने पक्ष, जनतेसाठी कार्यरत राहिलो आहे. ते पुढे म्हणाले, जीवनात असलेल्या अनेक संकटात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खंबीर पणे पाठशी उभे राहीले. कोरोनाच्या काळात मला वाचवण्याचे काम देवेंद्रजीनी केले आहे याची जाणीव आयुष्यभर राहील. जनतेसाठी काम करत असताना आपला सहकारी विधानसभेत जावा ही भावना माझ्या सर्व सहकाऱ्यांची आहे. भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या शिरूर हवेली यामध्ये भाजपाचा आमदार व्हावा ही इच्छा प्रत्येकाची आहे. त्याच अनुषंगाने या वेळी संधी मिळेल ही आशा प्रत्येकाला होती. महायुती मध्ये जागा जरी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाटेला गेली असेल तरी इथल्या भाजपा कार्यकर्त्यांच्या, माझ्या सहकाऱ्यांच्या आणि माता भगिनींच्या विनंतीला मान देत उमेदवार अर्ज दाखल करण्याचा निर्धार उपस्थित जनसमुदायाच्या साक्षीने श्री. कंद यांनी यावेळी केला. संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या या निर्धार मेळाव्याला भाजपाचे तालुका पदाधिकारी, अनेक गावांचे सरपंच, उपसरपंच व कंद याचे सहकारी आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांची अकोले स्ट्राँग रुमला भेट

## सुरक्षा व्यवस्थेचा आढावा



**अकोले : प्रतिनिधी**

**अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी अकोले येथील शासकीय धान्य गोदाम (जुने) येथे स्थापन केलेल्या स्ट्रॉंगरूमला भेट देऊन तेथील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.**

यावेळी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था, ईव्हीएम यंत्राचे वाटप व मत मोजणीच्या दिवशी जागेचे नियोजन याविषयी जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती घेतली. प्रशासनाच्या सर्व विभागांच्या निवडणूकविषयक तयारीचा आढावा व कामकाजाची पाहणी करून निवडणूक आचारसंहितेच्यादृष्टीने त्यांनी सूचना दिल्या. निवडणूक आयोगाच्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

पोलिस अधीक्षक ओला यांनी ईव्हीएम सुरक्षिततेच्या दृष्टीने स्ट्राँगरूमचे ठिकाण व परिसराची पाहणी केली. यावेळी अकोले विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सिद्धार्थ मोरे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, गटविकास अधिकारी विकास चौरे, नगरपंचायत मुख्याधिकारीपंकज गोसावी, निवासी नायब तहसीलदार किसान लोहारे, महसूल नायब तहसीलदार प्रमोद सावंत आदी उपस्थित होते.

# आधी काम, मगच मतदान ! आदिवासी समाजाचा ठराव

## लोणी व्यंकनाथला निर्धार सत्र



**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथे मतदानाबाबत निर्धार सत्र पार पडले. बैठकीत सर्वानुमते लोकप्रतिनिधींनी आधी आमची विकासकामे करावी, मगच मतदान करू अन्यथा मतदानावर बहिष्कार घालण्याचा इशारा आदिवासी नागरिकांनी दिला आहे.**

आजपर्यंत हा जवळचा, तो लांबचा म्हणत मतदान केले. मतदानाच्या वेळी दिलेले अनेक आश्वासने कागदावरच राहिली. श्रीगोंदे तालुक्यातील भटके, विमुक्त आदिवासी समाजाचा गेल्या ४० वर्षांत फक्त मतदानासाठी उपयोग करून घेतला. मुलभूत गरजा आणि विकासापासून हा समाज जाणूनबुजून कोसो दूर ठेवला. रेशनकार्डसाठी हा समाज ७० वर्षांपासूनही भांडत आहे, मग समाजाचा विकास झाला तरी कोठे? लोकप्रतिनिधींना आर्थिक विकास करण्यासाठी निधी मिळतो, मग भटक्या विमुक्त आदिवासी, गोरगरीब जनतेचा विकास करण्यासाठीच कोणताच मार्ग नाही का? आता आम्हाला विचारल्याशिवाय मतदान करणार नाही. विकासकामांना सुरूवात झाल्याशिवाय तालुक्यातील भटके व आदिवासी समाज मतदान करणार नसल्याचा इशारा बैठकीत देण्यात आला.

सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून सर्व लोकप्रतिनिधी समाजकारण, राजकारण करतात, मग हे त्यांना केवळ मतदान काळातच आठवते वा दिसते का? असाही सवाल यावेळी करण्यात आला. आजपर्यंत आम्ही तुमच्यासाठी केले, आता तुम्ही आमच्यासाठी करा, हे आता समजण्याची वेळ आली आहे. जो लोकप्रतिनिधी आमच्या समुहासाठी काम करतील, या समूहाच्या हालापेष्टा दिसतील, त्याच उमेदवाराला मतदान करणार आणि आमच्या हक्काचा आमदार विधानसभेत पाठवणार असल्याचे यावेळी ठरले. छाया भोसले, पल्लवी सोनवणे, संघर्ष समितीचे अध्यक्ष संतोष भोसले यावेळी उपस्थित होते.

# पातळी सोडून बोलाल तर माझ्याशी गाठ !

## डॉ. सुजय विखे यांचा सज्जड दम



**संगमनेर : प्रतिनिधी**

**तालुका फक्त कुटूंब आहे असे म्हणून चालत नाही,तर जबाबदारी पाडावी लागते.आमची सहनशीहता ही कमजोरी समजू नका आता पातळी सोडून बोलाल तर गाठ माझ्याशी आहे.तुमच्या मुलीला न्याय मिळाला पण गाडीतून ओढून मारहाण केलेल्या आमच्या बहिणीची माफी कोण मागणार असा परखड सवाल डॉ सुजय विखे पाटील यांनी उपस्थित केला.**

आंभोरे येथे आयोजित केलेल्या सभेत डॉ विखे पाटील यांनी आज लाव रे तो व्हीडीओ मधून काँग्रेस कार्यकर्त्यांनी गाड्या जाळण्याच्या कृत्याचा घटनाक्रम दाखवून मला मारण्यासाठी आमदारांचे बंधू इंद्रजित थोरात यांनीच हे सर्व कटकारस्थान रचले असल्याचा थेट आरोप केला.

डॉ. जयश्री थोरात यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यचा निषेध तसेच विखे पाटील कुटूबांच्या वतीने दिलगीरी व्यक्त करून डॉ.विखे पाटील म्हणाले की जो व्यक्ति बोलला तो आता जेल मध्ये आहे.पण आमच्या सभेसाठी आलेल्या महीलांना मारहाण करणारे कॉंगेस कार्यकर्ते उघडपणे तालुक्यात फितर आहेत.आमची संस्कृती काढून राज्यात बदनामी केली.पण आमच्या मतदार संघात येवून वडीलांबद्दल वाटेल ते बोलता.ज्याची ग्रामपंचायती मध्ये निवडवून यायाची लायकी नाही ते बोलतात आणि या तालुक्याचे आमदार हसतात ही तुमची संस्कृती आहे का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

आमच्या तालुक्यात येवून आरोप झाले तरी एक सायकल सुध्दा आम्ही जाळली नाही.आमची सहनशीहता कमजोरी समजू नका आमच्यावर लोकशाही मानण्यचे संस्कार आहेत.मला डोक्यावर पडला म्हणता आता कोण कोणाला पाडतो हेच दाखवतो असा टोलाही त्यांनी लगावला. विकासावर बोला हे आवाहन त्यांना दिले पण त्यावर ते बोलत नाही.पण केवळ व्यक्तिगत टिका करून वेळ मारून नेली जाते.वडीलांवर बोललो तर डॉ जयश्री ताईना खूप लागले.पण माझ्या वडीलांवर तुम्ही बोलता हे तीन वर्ष आम्ही सहन केले.पण आता पुन्हा बोललात तर माझी कशाचीही तयारी असल्यचा इशारा त्यांनी दिला.

अंधारातून तुम्ही युवक आणि महीलांना मारहाण केली अरे उजेडात येवून हल्ले करा. गाड्या पाठवता हत्यार घेवून पाठवता तुम्ही तुमच्या तालुक्यातील जनतेवरच हल्ले करता ते कोणी दुसरे नाहीत प्रेमापोटी सभेला आले होते.पण तुम्हाला ते सहन झाले नाही. या तालुक्यात परीवर्तन घडवायचे असेल तर दडपशाहीच्या विरोधात गावोगावी गनिमावा करून पेटून उठावे लागेल. आज जी आग माझ्या गाडीला लागली ती तुमच्या घरापर्यंत येण्यास वेळ लागणार नाही त्यामुळेच परिवर्तन करण्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन त्यांनी केले.

## वाचकांच्या लेखणीतून

# लेझीम

दिवस सुगीचे सुरू जाहले
ओला चारा, बैल माजले
शेतकरी मन प्रफुल्ल झाले
छन् खळ् खळ् छन्
ढुम् ढुम् पट ढुम्
लेझिम चाले जोरात!
दिवटी फुरफुर करू लागली
पटक्यांची वर टोके डुलली
रांग खेळण्या सज्ज जाहली
छन् खळ् खळ् छन्
ढुम् ढुम् पट ढुम्



लेझीम या शीर्षकाची सुंदर ग्रामीण कविता आम्हाला शाळेत अभ्यासाला होती. ग्रामीण भागात सुगीचे दिवस असल्याने शेतकरी प्रसन्न झालेले आहेत. हिरवा चारा खायला मिळाल्याने बैल धष्टपुष्ट आणि गुबगुबीत झालेले आहेत. शेतकरी आनंदले असल्याने लेझमाचा खेळ खेळतात. रात्रीचा समय असल्याने दिवटीच्या प्रकाशात शेतकरी लेझमाचा खेळ खेळत आहेत. वाऱ्याने दिवटीची ज्योत फुरफुर करू लागली. शेतकऱ्यांच्या पटक्यांची टोके त्या दिवटीच्या ज्योतीप्रमाणे डुलत आहेत. शेतकरी आता लेझीम खेळण्यासाठी रांगेत सज्ज झालेले आहेत. खेळाचा डाव सुरू झाला. लेझीम छन् खळ् खळ् छन् वाजत आहेत. ढोल ढम् ढम् पट ढुम् वाजत आहे.

१९७५ साली जुनी एस.एस.सी. (मॅट्रिक) चे शिक्षण होईपर्यंत मी आमच्या निघोज गावीच होतो. बालपणापासूनच मला लेझीम या खेळाची आवड होती. आमच्या मळ्यात आमच्या ढवळे भावकीचा लेझमाचा डाव होता. मी लेझीम खेळत असे नंतर ढोल वाजवायलसुध्दा शिकलो. मी सुंदर त-हेने ढोल वाजवीत असे. लयताल माझ्या रक्तातच आहे असे वाटते.

माझ्या मते आपल्या ग्रामीण भागात लेझीम खेळाच्या दोन पध्दती आहेत. एक ठाकरी लेझीम आणि दुसरी होलार लेझीम. ठाकर जातीत किंवा समाजात खेळला जाणारा तो ठाकरी पध्दतीचा लेझीम खेळ. होलार जातीत किंवा समाजात खेळला जाणारा तो होलार पध्दतीचा लेझीम खेळ. आमच्या भावकीचा खेळ होलार पध्दतीचा लेझीम होता. दोन्ही पध्दतीत ढोल वाजविणारा, झांज वाजविणारा ही सामान्य बाब असे. भिडूंच्या संख्येत तफावत असे. होलार पध्दतीत प्रत्यक्ष लेझीम खेळणारे कमीत कमी आठजण भिडू हवेच असत. त्याच्या पुढे दोनच्या पटीत वाढही चालत असे. खेळाचा पवित्रा बदलण्यासाठी बांगडी, वांगीफोड असे इशारावजा शब्द या खेळाचा म्होरक्या मोठ्याने पुकारी. त्यानुसार आम्ही खेळाचा पवित्रा बदलीत असू. ढिपांग ढिपांग पाडी ढिपांग ढिपांग असे ढोलाचे बोल असत. मी ढोल वाजवीत असताना आणि डाव रंगात आला असताना तालाचे वेगवेगळे अलंकारही वापरीत असे. ते शब्दांकित करता येत नाहीत.

ठाकरी खेळात नाजूकपणा असे. होलार खेळात उछलकूद किंवा उड्या जास्त माराव्या लागत. खेळाडूंचा पुरा घाम निघत असे!

लग्नाच्या वरातीसाठी त्या काळी लेझमाचा खेळ आवश्यक समजला जाई. कारण त्या काळात करमणुकीची साधने सीमित होती. एका वरातीसाठी साधारणपणे पन्नास रुपयांची सुपारी मिळे. परगावच्या सुपाऱ्याही मिळत. हल्ली हा ग्रामीण लेझीम खेळ क्वचितच दिसतो. किंबहुना तो नष्टच होण्याच्या मार्गावर आहे. शहरांतून शिवजयंती, गणेशोत्सव किंवा दसऱ्याच्या प्रसंगी लेझीम खेळतात. पण तो ग्रामीण लेझीम खेळापासून फारच वेगळा वाटतो. त्याचे मूळ आणि कूळ शालेय स्तरावरचे वाटते.

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### मा. आ. विजय औटी यांचा अपक्ष अर्ज दाखल

यांनी स्वतःसाठी एक तर भाजपासाठी एक, अमोल ज्ञानदेव गजरे देवीभोयरे यांनी शंकरप्रसाद दिगंबर गंधे जखणगांव यांच्यासाठी अपक्ष व आरपीआय आठवले गट प्रत्यकी एक अर्ज, सुहास रखमा पुजारी पुणेवाडी यांनी सुजित वसंतराव झावरे पाटील यांच्यासाठी प्रहार पक्षासाठी एक अर्ज खरेदी केले.

# संग्रामभैय्यांना नागापूरकरांच्या लाल दिव्यासाठी शुभेच्छा !

## सभेत झळकले फलक । नागापूरकरांच्या प्रेमाने संग्रामभैय्या भारावले




■ नागपूर येथे महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांचे उस्फुर्त स्वागत करण्यात आले.

### कोटयावधींचा निधी, परिसराचा कायापालट

नागापूरसाठी फेज टू योजनेअंतर्गत स्वतंत्र पाण्याची टाकी, काकासाहेब म्हस्के मेडिकल कॉलेज कमान ते डॉ. आंबेडकर चौक रस्ता काँक्रीटीकरण, पितळे कॉलनी परिसरातील संपूर्ण रस्त्याच्या कामास मंजुरी, ख्रिश्चन समाजाच्या दफनभुमीला संरक्षक भिंतीचे काम, आदर्शनगर येथील श्रीराम मंदिराचा सभामंडप, नागापूर हनुमान मंदिर सभा मंडपास मंजुरी, क्रिडांगणास संरक्षण भिंत आदी कोटयावधींची कामे होऊन परिसराचा कायापालट झाला आहे.

नगर : प्रतिनिधी

**विधानसभेच्या निवडणूकीत तिसऱ्यांदा उतलेल्या आ. संग्रामभैय्या जगताप यांचा मंत्रीमंडळात समावेश होऊन त्यांना लाल दिव्याची गाडी मिळावी यासाठी नागपूर, बोल्हेगावकरांनी सभेत लाल दिव्याच्या गाडीचे फलक झळकावत शुभेच्छा दिल्या. नागरिकांनी केलेल्या अभुतपूर्व स्वागतामुळे आ. जगताप हे भारावून गेले.**

महायुतीचे उमेदवार संग्रामभैय्या जगताप यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर दररोज शहरातील दोन प्रभागांमध्ये प्रचाराचा सपाटा लावला आहे. बोल्हेगांव व नागापूर या उपनगर परिसरात झालेल्या प्रचार फेऱ्यांमध्ये नागरीकांनी मोठया संख्येने सहभागी होत उस्फुर्त प्रतिसाद दिला. नागापूर येथील श्री चक्रधर स्वामी मंदिराचे महंत शाम महाराज यांचे आशीर्वाद घेतल्यानंतर ज्येष्ठ उद्योजक लिंबाशेठ नागरगोजे यांच्या हस्ते नारळ वाढवून प्रचार फेरीचा शुभारंभ करण्यात आला. ढोल ताशाच्या गजरात काढण्यात आलेल्या प्रचार फेरीचे परिसरात ठिकठिकाणी स्वागत करण्यात येऊन सत्कार तसेच महिलांनी त्यांचे औक्षणही केले.

### मुलभूत गरजांची पुर्तता

आ. जगताप यांनी नागापूर, बोल्हेगाव या परिसरात मोठया प्रमाणर विकास कामे करून रस्ते, पाणी, पथदिवे, आरोग्य या मुलभूत गरजा पुर्ण केल्याबद्दल क्रेनच्या सहाययाने आ. जगताप यांना मोठा पुष्पहार घालून आभार माणण्यात आले. आ. जगताप हे या निवडणूकीत विजयाची हॅट्रीक करतील असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

ॲड. राजेश कातोरे

यावेळी मा. नगरसेवक ॲड. राजेश कातोरे, मा. सभापती कुमारसिंह वाकळे, मा. सरपंच दत्ता सप्रे, मा. नगरसेवक डॉ. सागर बोरूडे, दत्तात्रय सप्रे, हनुमंतराव कातोरे, साहेबराव सप्रे, ज्ञानदेव सप्रे, ॲड. गणेश कातोरे, राणी भाकरे, वैशाली राजहंस, कांचन इंगवले, सुखदेव मते, राजेश सिंग, जॉन भाकरे, दीपक कातोरे,राहुल कातोरे, आकाश बारस्कर, प्रल्हाद कातोरे,सिमोन भाकरे, सुरेश भिंगारदिवे, राजू शेख, उज्वला वाघ, अनिता भोसले, डॉ. ठोंबरे,सुभाष लवांडे, नवनाथ पवार, श्री.कालेकर, अनंतकुमार दुबे, पप्पू काळे, लक्ष्मण काळे, किशोर भोर, बजरंग काळे, योगेश कातोरे, संतोष कातोरे, सौरभ कातोरे, लक्ष्मण कातोरे, लहानु भाऊ भोर, राधा पाटोळे,अनुसया भाकरे, बाळासाहेब जगदाळे, पंकज वाकळे आदी उपस्थित होते.

# हिवरेबाजारच्या शाळेत भरला आनंदी बाजार

## यशवंत सांस्कतिक भवनात विद्यार्थ्यांचा जल्लोष

हिवरेबाजार : प्रतिनिधी

**पदमश्री डॉ. पोपटराव पवार यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली आदर्शगाव हिवरेबाजार येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत आनंदी बाजार भरविण्यात आला. यशवंत सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या या बाजारामध्ये विद्यार्थ्यांनी जल्लोष केला.**



या बाजारचे उदघाटन हरीभाऊ जावळे ठाणगे यांच्या हस्ते करण्यात आले. सरपंच विमल ठाणगे, चेअरमन छबूराव ठाणगे, ग्रामपंचायत सदस्य रो. ना.पादीर,अर्चना ठाणगे यांनी यावेळी बाजारास भेट दिली.

या उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास,आत्मनिर्भरता, योग्यता, नेतत्व, सहनशीलता आणि शारीरिक वाढ होण्यासाठी निश्चित मदत मिळेल. मुलांचा उत्साह टिकवून ठेवण्यासाठी मदत मिळेल. विद्यार्थ्यांचा शिकण्याचा उत्साह टिकवून ठेवण्यासाठी मदत मिळेल. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कतीतून शिक्षण मिळत आहे. मुलींनी व्यवसायाची मांडणी, हिशोब, मार्केटींग, संवाद कौशल्य यासाठीहा उपक्रम महत्वपूर्ण ठरेल असे उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

या आनंद बाजारात विविध खाद्य पदार्थ, भाजीपाला, फळे आदींची विक्री करण्यात येऊन हजारो रूपयाची उलाढाल करण्यात आली. आपल्या पाल्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्यासाठी आनंदी बाजारास गावातील आणि परिसरातील ग्रामस्थांनी आणि पालकांनी मोठया संख्येने हजेरी लावली आणि खरेदीही केली. यावेळी नगरच्या स्नेहालय संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी दीपदान उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सहभागी होत दैनंदिन गरजा भागविण्यासाठी उपयोगात येणाऱ्या वस्तुंचे दान करण्यात आले. सर्व वस्तूंचे संकलन करून स्नेहालय संस्थेकडे सुपूर्द करण्यात आले.

# उध्दव ठाकरे यांचा आदेश शिरोधार्ह शहरप्रमुख नीलेश खोडदे यांची भूमिका

पारनेर : प्रतिनिधी

**२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये महाविकास आघाडीचा घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्या प्रचारात सक्रिय होउन आमच्यासाठी शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांचा आदेश शिरोधार्ह असल्याचे शिवसेनेचे पारनेर शहर प्रमुख नीलेश खोडदे यांनी सांगितले.**



खोडदे म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून आपण शिवसेनेचे निष्ठावान शिवसैनिक म्हणून पारनेर शहरात कार्यरत आहोत. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे संघटन शहरात मोठे आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांकडे आम्ही ही जागा शिवसेनेला देण्याची मागणी केली होती. मात्र जागावाटपात ही जागा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडे गेल्याने आता आघाडीचा धर्म म्हणून आम्ही कोणत्याही अटी शर्तीशिवाय महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्या प्रचारात सहभागी होणार आहोत.

खोडदे म्हणाले, मतदारसंघातील सर्व निष्ठावान शिवसैनिकही उध्दव ठाकरे यांच्या आदेशाचे पालन करून महाविकास आघाडीचा उमेदवार मोठया मताधिक्क्याने विजयी करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करणार असल्याचेही स्पष्ट करतानाच लवकरच पत्रकार परिषदेमध्ये शिवसैनिक आपली भूमिका मांडणार असल्याचे खोडदे यांनी पारनेर शहरप्रमुख नीलेश खोडदे हे निवडणूकीच्या निमित्ताने आपल्या सहकाऱ्यांसह सक्रीय झाल्याने पारनेर शहरामधील राणी लंके यांच्या मताधिक्क्यात वाढ करण्यासाठी मदत होणार आहे. प्रत्येक प्रभागात घरोघर जाऊन राणी लंके यांचा प्रचार करण्याचे नियोजन करण्यात येणार असून महाविकास आघाडीची भूमिका मतदारांपर्यत पोहचविण्यासाठीही आम्ही पुढाकार घेणार असल्याचे खोडदे म्हणाले.

# बाबासाहेब कवाद पतसंस्थेच्या दिवाळीपूर्वीच लाभांश

■ सभासदांना १२ टक्के तर सेवकांना १४ टक्के दराने सानुग्रह अनुदान
■ चेअरमन वसंत कवाद यांची माहिती



निघोज : प्रतिनिधी

**बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेने सभासदांना दिवाळीपूर्वी १२ टक्के लाभांश व कर्मचारी यांना १४ टक्के दराने सानुग्रह अनुदान व दिवाळी फराळासाठी १ बॉक्स किराणा किटचे वाटप करण्याचा निर्णय संस्थेचे चेअरमन वसंत कवाद, व्हा. चेअरमन नामदेवराव थोरात व संचालक मंडळ यांनी मासिक मिटींग मध्ये घेतला होता .**

यावेळी संस्थेचे चेअरमन कवाद यांनी सांगितले की दि. २८/१०/२०२४ पासुन संस्थेच्या सभासदांना १२ टक्के दराने लाभांश रक्कम ६० लाख ९१ हजार रुपये वाटप करण्याचे चालू केले असून त्याचबरोबर सेवकांना १४ टक्के सानुग्रह अनुदान २६ लाख ४२ हजार रूपये व संस्थेच्या ८५ सेवकांना प्रत्येकी २ हजार रुपयांचा दिवाळी फराळासाठी किराणा दिलेला आहे .

यावेळी संस्थेचे चेअरमन वसंत कवाद ,संस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात संस्थेचे ज्येष्ठ संचालक चंद्रकांत लामखडे, शांताराम कळसकर , निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष तसेच मळगंगा कंट्रक्शनचे संस्थापक अध्यक्ष अमृताशेठ शेठ रसाळ , तसेच संस्थेचे संचालक मंडळ यांचे हस्ते सेवकांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे चेअरमन कवाद यांनी सर्व सभासदांना विनंती केली की संस्थेच्या सर्व शाखामध्ये सभासदांना १२ टक्के दराने लाभांश रक्कम सभासदांच्या सेव्हिंग खाते वरती जमा केलेली आहे.तरी सर्व सभासदांनी आपल्या खात्यावरती जमा केलेली लाभांशाची रक्कम घेऊन जाण्याचे आवाहन केले आहे.

### बाबाशेठची परंपरा पदाधिकाऱ्यांनी जपली

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांनी प्रत्येकी दिवाळीला कर्मचारी व अधिकारी यांना दिवाळी बोनस,किराणा कीट देऊन परंपरा जतन करीत कर्मचारी व अधिकारी यांना सातत्याने जपण्याचे काम केले आहे. सर्वांच्या सुखदु:खात सहभागी होऊन कवाद यांनी सर्वसामान्य जनतेला मुलांसारखे जपले आहे. तीच परंपरा सुरू ठेवीत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व संचालक मंडळ यांनी कवाद यांचे अनुकरण केले आहे.

**अमृताशेठ रसाळ**
व्हा. चेअरमन निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्था व संस्थापक अध्यक्ष मळगंगा कंट्रक्शन

**रामदासशेठ वरखडे**
मा. चेअरमन निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्था व कार्याध्यक्ष निघोज व्यापारी असोसिएशन

यावेळी संस्थेचे संचालक मंडळ , संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके, जनरल मॅनेजर संपतराव ठुबे, वरिष्ठ अधिकारी शांताराम सुरकुंडे, सुनिल तांबे सर्व विभाग प्रमुख , शाखाधिकारी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संचालक शांताराम कळसकर यांनी केले आभार मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके यांनी मानले.

# भुकन, लंके यांच्या पाठबळावर दूध उत्पादकांचा विकास - खा.नीलेश लंके

## गाथा फूड प्रॉडक्सचा शुभारंभ

निघोज : प्रतिनिधी

**अरुणशेठ लंके, दत्तात्रय भुकन, मंगेश लंके यांनी गेली पंधरा ते वीस वर्षात दूध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ दिले आहे म्हणून खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला असून भुकन व लंके बंधू यांचे दूध व्यवसायात मोठे योगदान असून शिरुर व पारनेर तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांचा आर्थिक विकास त्यांच्यामुळे झाला असल्याचे गौरवोद्गार खा .नीलेश लंके यांनी व्यक्त केले.**

खडकवाडी येथील गाथा फूड प्रॉडक्ट या दूध व्यवसाय केंद्राचे उद्घाटन खासदार लंके यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. या व्यवसायाचे संचालक अरुणशेठ लंके, दत्तात्रय भुकन, मंगेश लंके यांनी यावेळी उपस्थित असलेल्या दूध उत्पादक शेतकरी, विविध गावचे पदाधिकारी व उद्योजक, उद्योगपती यांचे स्वागत केले.

खा.लंके यावेळी म्हणाले गेली पंधरा ते वीस वर्षात या त्रिमूर्तींनी दूध व्यवसाय करताना कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांचे मार्गदर्शन घेत व्यवसायात आपली प्रगती करताना सर्वाधिक प्रगती शेतकऱ्यांची कशी होईल यासाठी प्रयत्न केले. कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शांताराम लंके यांनी गेली पंचवीस वर्षांपूर्वी कन्हैयाची मुहुर्तमेढ रोवली.



राज्यातील लाखो कुटुंबांना हक्काचा रोजगार उपलब्ध करून दिला. हजारो व्यवसायिकांना पाठबळ देत त्यांनी राज्य व्यवसाय व उद्योग क्षेत्रात कशाप्रकारे अग्रेसर राहील यासाठी कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वाधिक योगदान आहे. त्यांचेच अनुकरण करीत लंके व भुकन या त्रिमूर्तींनी निघोज, वडझिरे, लोणीमावळा शिरुर तालुक्यातील जांबुत या ठिकाणी दूध संकलन केंद्र सुरु करीत दूध व्यवसायात सर्वोत्कृष्ट काम केले असून युवकांनी व्यवसाय उद्योग केला पाहिजे तरच आपली प्रगती होईल हे दाखवून दिले आहे. यावेळी गाथा फूड प्रॉडक्टचे संचालक अरुणशेठ लंके, दत्तात्रय भुकन, मंगेश लंके यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करीत उपस्थितांचे आभार मानले.

# अहिल्या नगरच्या रणांगणात लेकी

## ■ श्रीगोंद्यात पाचपुते - नागवडे यांचे द्वंद्व ■ पारनेरमध्ये राणीताई लंके यांनी रणसिंग फुंकले ■ शेवगाव- पाथर्डी पुन्हा मोनिकाताई राजळे

पारनेर : नाना करंजुले

**राजकारणाचे माहेरघर असणाऱ्या अहिल्यानगरमध्ये विशेष करून दक्षिणेत या ठिकाणच्या लेकींनी विधानसभेच्या रणांगणात उडी घेतली आहे. श्रीगोंदा मध्ये तर पाचपुते-नागवडे यांच्या अर्धांगिनी यांचे राजकीय द्वंद्व पहावयास मिळणार आहे. पुन्हा एकदा दोन कुटुंबियांमधील काटे की टक्कर हा मतदारसंघासह संपूर्ण जिल्हा आणि राज्याला अनुभवता येणार आहे. तर पारनेरमधून राणीताई नीलेश लंके यांनी रणसिंग फुंकले असून त्यांची लढाई जिल्हा परिषदेचे माजी सभापती काशिनाथ दाते यांच्याशी होणार आहे. शेवगाव -पाथर्डी मध्ये मोनिकाताई राजळे या पुन्हा एकदा निवडणूक रिंगणात उतरलेले आहेत. परिणामी या ठिकाणी महिलांना यावेळी बऱ्यापैकी संधी प्राप्त झाल्याने समस्त स्त्री शक्ती मध्ये सुद्धा एक समाधानाचे वातावरण आहे.**



अहिल्यानगर या जिल्ह्यामध्ये दक्षिण आणि उत्तर असे दोन भाग आहेत. एकूण बारा विधानसभा मतदारसंघातून सहा अलीकडे आणि सहा पलीकडे अशी विभागणी झालेली आहे. हा जिल्हा साखर, शिक्षण आणि सहकार क्षेत्रामध्ये अग्रेसर असणार आहे. येथील राजकीय घराण्यांनी राज्याच्या राजकारणाला दिशा देण्याचे अनेकदा काम केले आहे. अहिल्यानगर ने हेवी वेट पॉलिटिकल लीडर महाराष्ट्राला दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ३३ टक्के आरक्षण दिले गेल्यामुळे महिलांना प्रतिनिधित्व मिळावे लागले. त्याला अहिल्यानगर सुद्धा अपवाद ठरलेला नाही. प्रस्थापितांच्या या जिल्ह्यामध्ये विधानसभा आणि लोकसभेमध्ये महिलांना फारसे नेतृत्व करता आले नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. कारण या ठिकाणी आरक्षण नसल्याने मतदारसंघांवर पुरुषांची मक्तेदारी सातत्याने कायम राहिली. परिणामी राजकीय कौशल्य, नेतृत्व, कर्तुत्व आणि वक्तृत्व असतानाही स्त्रियांना विधिमंडळ आणि संसदेत प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली गेली नाही. अर्थात पुरुषी मानसिकता त्याचबरोबर राजकीय पक्षांची उदासीनता ,स्थानिक नेतृत्वाला सत्तेचा असणारा हव्यास या सर्व गोष्टी याला कारणीभूत आहेत. मात्र शेवगाव- पाथर्डी मतदार संघात पुरोगामी विचारांच्या आणि समानता मानणाऱ्या राजीव राजळे यांनी आपल्या पत्नी मोनिकाताई राजळे यांना पुढे आणले. त्यांना पाठबळ आणि प्रोत्साहन देत विधानसभेच्या रणांगणात उतरवले. दरम्यान भारतीय जनता पक्षाकडून त्या आमदार झाल्या. गेल्या दहा वर्षांपासून त्या या विभागाचे नेतृत्व करीत आहेत. राजळे तिसऱ्यांदा निवडणूक रिंगणात आहेत. प्रताप ढाकणे यांच्याशी त्यांचा सामना होणार आहे.

श्रीगोंदा विधानसभा मतदार संघावर सातत्याने नागवडे आणि पाचपुते यांचा प्रभाव राहिला. मध्यंतरी राहुल जगताप यांची एक टर्म बाजूला ठेवली तर या दोन कुटुंबीयांकडेच विधिमंडळाचे प्रतिनिधित्व राहिलेले आहे. परंतु यावेळी बबनराव पाचपुते किंवा राजेंद्र नागवडे यांच्या ऐवजी त्यांच्या पत्नी प्रतिभाताई पाचपुते आणि अनुराधाताई नागवडे यांना अनुक्रमे भाजप आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाने उमेदवारी दिली आहे. परिणामी या तालुक्याला पहिल्या महिला आमदार लाभणार आहेत. प्रतिभाताईनी आपल्या पतीला सातत्याने पाठबळ दिले. तर अनुराधा नागवडे यांनी राजकीय नेतृत्व केले आहे. या दोघींमध्ये लढत होणार असून एका उमेदवाराला विधिमंडळात प्रतिनिधित्व करता येणार आहे. त्यांच्या रूपाने महिलांना संधी मिळाल्यामुळे तालुक्यातील स्त्रियांमध्ये सुद्धा एक समाधान आणि आनंदाचे वातावरण आहे. दोघींकडेही राजकीय कौशल्य आणि खंबीरपणा असल्याने ज्याला संधी मिळेल ते या भागाचे समस्या आणि अडचणी सोडवतील त्याचबरोबर सभागृहात सुद्धा विविध प्रश्नांना वाचा फोडतील असा विश्वास राजकीय जाणकारांनी व्यक्त केला आहे.बबनराव पाचपुते आणि राजेंद्र नागवडे यांना मात्र आता सल्लागाराच्या भूमिकेत हा मतदारसंघ पाहणार आहे.

### पारनेर -नगर मध्ये राणीताई लंके!

नीलेश लंके खासदार झाल्यामुळे पारनेर नगर विधानसभा मतदारसंघांमध्ये त्यांच्या पत्नी राणीताई लंके यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने निवडणूक रिंगणात उतरवले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काम करण्याचा दांडगा अनुभव, प्रचंड मोठ्या प्रमाणात जनसंपर्क मतदार संघाची खडाना खडा माहिती, त्याचबरोबर खासदार निलेश लंके यांच्या खांद्याला खांदा लावून कोरोना आणि इतर प्रतिकूल परिस्थितीमध्ये केलेल्या कामाची पुण्याई ही राणीताई लंके यांची सकारात्मक बाजू आहे. सेनापती बापट, पद्मभूषण अण्णासाहेब हजारे, पोपटराव पवार यांच्या जन्म आणि कर्मभूमी असलेल्या या मतदार संघात कित्येक वर्षाने एका महिलेला विधिमंडळाचे सदस्य होण्याची संधी आली आहे. परिणामी या ठिकाणच्या महिला भगिनींना आजच आपण आमदार झाल्यासारखे वाटत आहे.स्त्रियांचे पाठबळ आणि पाठिंबा त्यांना मिळताना दिसत आहे. हे राणीताई लंके यांची जमेची बाजू आहे. महसूल मंत्र्यांच्या विरोधामध्ये प्रभावती शिर्डी विधानसभेच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रभावती जनार्दन घोगरे यांना काँग्रेसने उमेदवारी दिली आहे. नगर दक्षिण आणि शिर्डी लोकसभा मतदारसंघांमध्ये प्रभावती ताई घोगरे या स्टार प्रचार राहिल्या. विखे कुटुंबाचा खरपूस समाचार ही त्यांची ओळख आहे. सलग सात वेळा आमदार झालेल्या महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विरोधात त्यांना संधी देण्यात आली आहे. विखे पाटलांसारख्या मातब्बर उमेदवाराला टक्कर देण्याचे धाडस प्रभावती ताई घोगरे यांनी केले आहे. त्यात त्यांना यश आले तर राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारा निकाल असेल.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com